| | |
|---|---|
| | **भुसंपादन निर्देशन दरखास्त क्र. ३७/२०२५ मधील निशाणी क्रमांक १ खालील आदेश [ MHWS050004242025 ]** |

१) धनको नामदेव होना चव्हाण यांनी न्यायालयात जमा असलेली नुकसान भरपाईची रक्कम रु.०८,२८,५६२/– मिळणेकरिता अर्ज निशाणी क्र. ९ दाखल केलेला आहे.

२) प्रस्तुतचा अर्ज वाचला. त्या अनुषंगाने ऋणको क्र. १ ते ३ यांच्या विधीज्ञांनी त्याच अर्जावर दिलेले त्यांचे म्हणणे विचारात घेतले. धनको यांच्या तर्फे विधीज्ञ श्री. एम.यु.राठोड यांचा आणि ऋणको क्र. १ व २ यांच्यातर्फे सहायक सरकारी वकील श्री. आर एम बेलोकार आणि ऋणको क्र ३ यांचेतर्फे विधीज्ञ श्री. व्ही.टी.अकोटकर यांचा युक्तीवाद ऐकला.

३) धनको यांच्या विधीज्ञांनी असा युक्तिवाद केला की, धनको नामदेव होना चव्हाण यांनी एल.ए.सी. क्र.०१/२०१७ (जुना एल.ए.सी. क्र. ०९/२०१७ आणि १०/२०१७) ही दाखल केली होती व ती दिनांक ०३.०५.२०२५ रोजी निकाली निघालेली आहे. ऋणको यांनी धनको यांना देय असलेल्या रकमेपोटी रक्कम रु.०८,२८,५६२/– चा धनादेश न्यायालयाचे सी.सी.डी. नं.२१२/२०२६ अन्वये दिनांक २४.०२.२०२६ रोजी दाखल केलेला आहे. शासनाने कोणतेही अपील मा. उच्च न्यायालयामध्ये दाखल केलेले नाही व तसा स्थगनादेश नाही. भविष्यामध्ये तश्याप्रकारचे अपील झाल्यास व धनको यांचे विरुध्द निकाल लागल्यास धनको रक्कम रु.०८,२८,५६२/– न्यायालयात जमा करण्यास तयार आहे आणि धनको यांनी निशाणी क्र. १० अन्वये त्याबाबतचे त्यांचे क्षतिपूर्ती बंधपत्र (indemnity bond) दिले आहे. तरी न्यायालयात जमा असलेली रक्कम धनको यांना देण्यात यावी.

४) याउलट ऋणको क्र. १ ते ३ यांचे विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, या प्रकरणात अपील झाल्यास व अपील धनको यांच्या विरुध्द गेल्यास धनको यांनी ती रक्कम न्यायालयात जमा करण्याच्या अटीवर देण्यास हरकत नाही.

५) अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, धनको नामदेव होना चव्हाण यांनी एल.ए.सी. क्र.०१/२०१७ (जुना एल.ए.सी. क्र. ०९/२०१७ आणि १०/२०१७) हा दाखल केला व तो अर्ज तत्कालीन न्यायिक अधिकारी यांनी दिनांक ०३.०५.२०२५ रोजीच्या न्यायनिर्णयानुसार अंशतः मंजूर केला व त्या अनुषंगाने धनको यांनी प्रस्तुतची दरखास्त ही दिनांक १६.०७.२०२५ रोजी रक्कम रु.११,५९,४८०/– च्या वसुलीकरिता दाखल केलेली आहे. तसेच, धनको यांनी त्यांना नुकसान भरपाईची रक्कम रुपये ०८,२८,५६२/– मिळण्यासाठी प्रस्तूतचा अर्ज निशाणी क्र. ९ दाखल केलेला आहे.

६) प्रस्तूत अर्जाचे अनुषंगाने सहाय्यक अधिक्षक (वित्त व रोखे), दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, मंगरुळपीर यांचा अहवाल मागविण्यात आला व त्यांनी दिनांक १०.०४.२०२६ रोजी असा अहवाल दिला की, रक्कम रु. ०८,२८,५६२/– ही सी.सी.डी.क्र. २१२/२०२६ अन्वये दि. २६.०२.२०२६ रोजी जमा केली असून ती न्यायालयात दिवाणी ठेव खात्यात जमा आहे.

७) धनको नामदेव होना चव्हाण यांनी निशाणी क्र.१० अन्वये त्यांचे बंधपत्र (indemnity bond) १००/– रुपयाच्या स्टॅम्पवर दिले आहे.

८) उपरोक्त सर्व परिस्थिती, धनको यांचे बंधपत्र निशाणी क्र.१०, एल.ए.सी. क्र.०१/२०१७ मधील दिनांक ०३.०५.२०२५ रोजीच्या हुकूमनाम्याची सत्यप्रत निशाणी क्र. ११, सहाय्यक अधिक्षक (वित्त विभाग) यांचा उपरोक्त अहवाल आणि धनको यांचे विधीज्ञ यांचा उपरोक्त युक्तीवाद हे सर्व एकत्रीतरित्या विचारात घेवून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे,

## आदेश

१] अर्ज निशाणी क्र.०९ मंजूर करण्यात येत आहे.

२] सहाय्यक अधिक्षक (वित्त विभाग), दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, मंगरुळपीर यांनी धनको नामदेव होना चव्हाण रा. सिंगडोह, ता. मानोरा, जि. वाशिम यांना पडताळणीअंती प्रस्तुत दरखास्तीमध्ये दि.२४.०२.२०२६ रोजी

सी.सी.डी.क्र.२१२/२०२६ अन्वये न्यायालयात जमा असलेली रक्कम रु. ०८,२८,५६२/- ही व्याजासह प्रदान करावी.

३] रक्कम प्रदान केल्याबाबतची नोंद संबंधीत रजिष्टरमध्ये घेण्यात यावी.

Digitally signed by HAMBIRE DHANANJAY BHAGWANRAO
Date: 2026.04.27 15:37:21 +0530

स्थळ : मंगरुळपीर. ( ध. भ. हंबीरे )
दिनांक : २७.०४.२०२६ दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, मंगरुळपीर.